**कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.**

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २६.०८.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत**

दिनांक २६.०८.२०१५ रोजी दु. ३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची २६ वी बैठक कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. ओमप्रकाश यादव | : | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. श्री. एच.के. जावळे (भा.प्र.से.) | : | राज्य शासनाचे प्रतिनिधी तथा कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| ३. | श्रीम. मेघा धवल आपटे | : | मालक प्रतिनिधी |
| ४. | श्री. श्रीपाद कुटासकर | : | कामगार प्रतिनिधी |
| ५. | श्री. विजय देवरुखकर | : | कामगार प्रतिनिधी |
| ६. | श्री. स. अ. मु. नकवी | : | संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई |
| ७. | श्री. बाळासाहेब कोळसे | : | सह सचिव, कामगार-७ |
| ८. | श्री. सतिश मगर | : | मालक प्रतिनिधी |
| ९. | श्री. अशोक गोविंदराव भुताड | : | कामगार प्रतिनिधी |

बैठकीच्या सुरुवातीस सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष, शासन प्रतिनिधी, मालक प्रतिनिधी व कामगार प्रतिनिधींचे स्वागत केले. बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांसंबंधीच्या कागदपत्रांचा संच सर्व मान्यवर सदस्यांना वितरित करण्यात आला.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदयांनी बैठकीचे कोरम पूर्ण झाल्याची खात्री करुन बैठकीस उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत केले.

मंडळाच्या सचिव यांनी सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे विषयनिहाय चर्चा करण्यात येत असल्याचे सांगितले.

## बैठकीची विषयसूची

**विषय क्र. १) : मागील बैठकीचे इतिवृत्तांत मंजूर करणे.**

दिनांक १५.०७.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीस सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली.

## मा. अध्यक्षांनी सुचविलेले विषय

**विषय क्र. २) : मंडळाच्या मुख्यालयासाठी स्वतंत्र कार्यालय घेणेबाबत.**

कामगार आयुक्त यांनी मागील बैठकीत सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशनमध्ये चौथ्या मजल्यावर जागा भाड्याने उपलब्ध होण्याकरीता त्यांना कार्यालयाचे पत्र पाठविण्यात आले आहे.

मा. अध्यक्षांनी महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशनमध्येच आपल्या मंडळासाठी जागा का घेण्यात यावी अशी विचारणा केली, यावर कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, सदरची जागा ही शासकीय इमारतीमध्ये असून कामगार आयुक्त कार्यालयाच्या जवळ आहे तसेच या कार्यालयातून मंडळाचे कामकाज पाहणे सोयीस्कर होईल. अन्यथा इतरत्र जागेकरीता निविदा काढावी.

यावर मा. अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशनमध्ये जागा घेण्यापेक्षा नरीमन पॉईंट येथे आपण जागा भाड्याने घेवू शकतो, कारण वांद्रे-कुर्ला संकुल येथील जागेच्या दरापेक्षा नरीमन पॉईंट येथील जागेचे दर त्यामानाने कमी असून परवडणारे आहेत तसेच तेथे चांगल्या सोयीसुविधा आहेत त्यामुळे नरीमन पॉईंट येथील जागा आपण पहावयास हवी. यावर उपस्थित सर्व सदस्यांनी विचारविनिमय करुन नरीमन पॉईंट येथील जागा पाहून त्यानंतर कोणती जागा घ्यावयाची हे निश्चित करता येईल असे मा. अध्यक्षांनी सांगितले.

कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, इतिवृत्तांत मंजूर होण्याआधी जागेकरीता ई-निविदा काढाव्यात. यावर मा. अध्यक्ष यांनी जागेकरीता ई-निविदा काढण्याचे काम हे ७ दिवसांच्या आत पूर्ण करावे अशा सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांना सूचना दिल्या. संचालक, लेखा व कोषागरे यांनी असे सांगितले की, इमारत व इतर बांधकाम कामगार

कल्याणकारी मंडळाकरीता जागेची निवड करण्याआधी मंडळाच्या कामकाजाची व्याप्ती किती आहे हे तपासून सदर कामाकरीता किती अधिकारी / कर्मचारी यांची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे बिल्डींगची बेस प्राईस तसेच किती जागेची गरज आहे याचा पूर्ण आराखडा तयार करुन पीडब्ल्युडीकडून माहिती मिळवून प्रपोजल फाईल तयार करावी. यावर मा. अध्यक्षांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दर काढून त्याप्रमाणे निविदा काढावी, असे सांगितले.

## विषय क्र. ३) : कामगारांची नोंदणी बांधकाम कामगारांच्या शपथपत्राच्या आधारे करणेबाबत.

प्रथमत: बांधकाम कामगारांच्या नोंदणी बाबत कायदेशीर काय तरतूद आहे याबाबत कामगार आयुक्त यांनी सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांना विचारणा केली.

यावर सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी असे सांगितले की, कलम १२ नुसार बांधकाम कामगाराने ९० दिवस काम केलेले असावे. मा. अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, औरंगाबाद जिल्ह्यामध्ये २९,००० बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली असून २५,००० नुतनीकरण झालेले आहे. नागपूर जिल्ह्यामध्ये ७,५०० बांधकाम कामगारांची तर पुणे जिल्ह्यामध्ये ७००० कामगारांची नोंदणी मंडळामध्ये करण्यात आली आहे. यावेळी कामगार आयुक्तांनी मा. अध्यक्षांना कायदा केंद्र सरकारचा असून नियम हे राज्य सरकारने तयार केलेले आहेत याबाबतची माहिती दिली.

बांधकाम कामगाराने ९० दिवस काम पूर्ण केल्यानंतर त्यांची बांधकाम कामगार म्हणून नोंदणी करुन बांधकाम कामगार असल्याबाबतचे प्रमाणपत्र ठेकेदार किंवा कंत्राटदार किंवा महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत कार्यालये येथूनदिले जात नाही. त्यामुळे इतर राज्यांच्या तुलनेत मुंबई येथे मोठ्या प्रमाणात बांधकाम कामे सुरु असून मोठ्या प्रमाणात कामगार काम करतात परंतू असे असतानाही ते नोंदीत केले जात नाहीत, ही सर्वात मोठी अडचण नोंदणी करताना येते, अशी खंत मा. अध्यक्षांनी व्यक्त केली.

कामगारांची नोंदणी बांधकाम कामगारांचे शपथपत्र घेवून करावे अशा आशयाचे निवेदन श्री. कुटासकर, कामगार प्रतिनिधी यांनी बैठकीत सादर केले. कामगारांनी बांधकाम कामगार म्हणून ९० दिवस काम केल्यानंतर स्वतः शपथपत्र अर्जासह मंडळाच्या कार्यालयात जमा केल्यानंतर त्यांची नोदंणी करण्यात यावी असे श्री. कुटासकर यांनी सांगितले. त्यास श्रीमती मेघा आपटे यांनी सहमती दर्शविली.

यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, बांधकाम कामगारांची नोंदणी कमी असण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांना नोंदणीच्या वेळी मागील वर्षभरात कमीत कमी ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. गुजरात उच्च न्यायालयाने असे आदेश पारित केले आहेत की, ज्या बांधकाम कामगारांना ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र मिळत नाही अशा बांधकाम कामगारांची संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे बांधकाम नोंदणी करण्यात यावी. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे बांधकाम कामगारांची मंडळात नोंदणी करण्याची अधिसूचना दि. १३.०८.२०१४ रोजी काढलेली आहे. यामुळे ज्या बांधकाम कामगारांना ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी निर्माण होतात. त्यांना असे प्रमाणपत्र मिळणे शक्य झालेले आहे.

मा. अध्यक्षांनी यावेळी औरंगाबाद जिल्ह्यामध्ये २९ हजार बांधकाम कामगारांची नोंदणी झाल्याचे सांगितले. औरंगाबाद जिल्ह्यामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात जर नोंदणी होते तर मुंबई सारख्या जास्त लोकसंख्या असलेल्या ठिकाणी ही संख्या फक्त १६,७२४ एवढी आहे. ही फार कमी नोंदणी होत आहे. त्यामुळे मुंबईमध्ये बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविली पाहिजे.

यावर कामगार आयुक्त यांनी प्रतिपादन केले की, आपल्याला कायद्यामध्ये राहूनच बांधकाम कामगारांची नोंदणी करता येते. तसेच बांधकाम कामगारांचे सेल्फ सर्टिफिकेशन घेवून नोंदणी केल्यास बोगस नोंदणीचे प्रमाण जास्त प्रमाणात वाढेल.

वरील चर्चेअंती बांधकाम कामगारांच्या नोंदणीबाबतचा मुद्दा मा. मंत्री महोदयांच्या बरोबर चर्चा करुन या विषयावर निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४): कामगार नोंदणीसाठी जिल्हा कार्यालयाच्या यंत्रणेमार्फत नोंदणी अभियान राबविणेबाबत..**

मा. अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की. बांधकाम कामगारांची नोंदणी वाढण्याकरीता जिल्हा कार्यालयाच्या यंत्रणेमार्फत जिल्हास्तरावर जनजागृती होणे आवश्यक आहे. बहुतांश बांधकाम कामगार हे सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत पूर्ण दिवस बांधकामाच्या ठिकाणी काम करीत राहतात. त्यामुळे त्यांना इतर कोणत्याही कार्यालयात जाण्यास वेळ मिळत नाही. त्यामुळे त्यांना मंडळाकडे नोंदित होता येत नाही व शासनाने दिलले फायदे त्यांच्यापर्यंत पाहोचू शकत नाहीत. त्यामुळे जिल्हा कार्यालयातील अधिका-यांनी बांधकामाच्या ठिकाणी जाऊन बांधकाम कामगारांची नोंदणी करण्याबाबत कॅम्प लावावेत जेणेकरुन जनसामान्यात याबाबत जनजागृती होईल व त्यामुळे बऱ्याच प्रमाणात बांधकाम कामगारांच्या नोंदणीमध्ये वाढ होण्यास मदत होईल व ते विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेवू शकतील.

मा. अध्यक्षांनी बांधकाम कामगारांकरीता जिल्हा कार्यालयाकडून कॅम्प लावून तसेच बांधकाम कामाच्या ठिकाणी बॅनर लावून त्यांच्यामध्ये जनजागृती करण्यात यावी. तसेच कामगारांच्या नोंदणीचे काम बाह्य यंत्रणेमार्फत करुन घेण्याची बाब शासन विचाराधीन असली तरी सदर नोंदणी बाह्य यंत्रणेमार्फत होईपर्यंत बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे काम हे जिल्हा कार्यालयातील सरकारी कामगार अधिकारी यांचेकडून करुन घेण्यात यावे व तशा सूचना जिल्हा कार्यालयांना द्याव्यात असे सांगितले.

**विषय क्र. ५) : कामगार नोंदणीचे काम बाह्य यंत्रणेद्वारे करुन घेणेबाबत.**

कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, कामगार नोंदणीसाठी आवश्यक असलेली माहिती बांधकामाच्या ठिकाणी जावून गोळा करणे, संबंधित बांधकाम कामगाराचे बायोमेट्रिक डिटेल्स घेणे, ते एका सॉफटवेअर ॲप्लिकेशनवर अपलोड करणे, सदर माहिती संबंधित अधिकारी यांना सादर करणे, कामगार अधिका-यांनी पात्र ठरविलेल्या कामगारांना ओळखपत्र वाटप करणे इ. काम बाहय यंत्रणेद्वारे करुन घेण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आलेला आहे.

उपरोक्त बायोमॅट्रिक नोंदणीचा प्रस्ताव मा. मंत्री महोदयांपुढे मान्यतकरीता पाठविण्यात आलेला आहे.

श्री. कुटासकर, कामगार प्रतिनिधी यांनी कामगारांची नोंदणी सेल्फ सर्टीफिकेशनद्वारे करण्यात यावी अथवा तात्काळ बाह्य यंत्रणेमार्फत कामगारांच्या नोंदणीचे काम सुरु करण्यात यावे. असे सुचविले.

यावेळी श्री. कोळसे पाटील, सह सचिव (कामगार) यांनी असे सांगितले की, सेल्फ सर्टिफिकेशनद्वारे नोंदणी करणे योग्य होणार नाही त्यामुळे जास्तीत जास्त बोगस नोंदणी होण्याची शक्यता आहे. तसेच कामगारांची नोंदणी बाह्य यंत्रणेमार्फत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडून निर्णय आल्यानंतर घेण्यात येईल. यावेळी कामगार आयुक्त यांनी असेही सांगितले की, शासन नियमानुसार कोणतेही काम ३ लाखांच्यावर असेल तर ई-निविदा काढावी लागते. त्यामुळे याबाबतीत शासनाची मंजूरी आल्यानंतर ई-निविदा पध्दतीने बाहय यंत्रणेची नियुक्ती करणे योग्य राहील. त्यास सर्वांनी सहमती दर्शविली.

**विषय क्र. ६) : नोंदीत बांधकाम कामगारांच्या कौशल्यवृध्दीबाबत.**

यावेळी श्री. राऊत, सहायक कामगार आयुक्त यांनी केंद्र सरकारच्या बांधकाम कामगारांसाठी तयार करण्यात आलेल्या RPL योजनेबाबत माहिती दिली. याबाबतची सविस्तर माहिती कामगार आयुक्त यांनी दिली. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, केंद्र शासनाच्या कामगार विभागाने बांधकाम कामगारांसाठी कॉशल्य वृध्दी योजना राबविण्यासाठी RPL (Recognision of Prior Learning) स्कीम तयार केली आहे. त्यासाठी केंद्र शासनाने काही मार्गदर्शक तत्वे तयार केली आहेत. त्यानुसार ज्या साईटवर २०० किंवा २०० पेक्षा जास्त कामगार आहेत अशा साईटसवर ट्रेनिंग सेंटर बनवून प्रत्यक्ष साईटवरच बांधकाम कामगारांना ट्रेनिंग देण्यात यावे असे म्हटले आहे. यामध्ये यासाठी केंद्र शासनाने ६ ट्रेडस आयडेंटिफाय केले आहेत. त्यासाठी ट्रेनिंग नीड्स असेसर आणि ट्रेनिंग प्रोव्हायडर यांची नियुक्ती करावी व ज्या

कामगारांना जे स्कील गॅप्स आहेत त्याचे ट्रेनिंग देण्यात यावे असेही नमूद आहे. यामध्ये त्यांना १२० तासांचे ट्रेनिंग दिले जाते.

या कामाकरिता ट्रेनिंग प्रोव्हायडर व ट्रेनिंग असेसर यांची नियुक्ती करण्याचे देखील निकष केंद्र शासनाने ठरवून दिले आहेत. त्यानुसार ट्रेनिंग असेसर व ट्रेनिंग प्रोव्हायडर यांचा केंद्र शासनाच्या National Skill Ministry अंतर्गत पुरस्कृत NSDC (National Skill Development Center) या संस्थेबरोबर एम्पॅनलमेंट असणे आवश्यक आहे. राज्यस्तरावरील प्राधिकारणास २०% पर्यंतचा निधी कामगारांच्या कौशल्यवृध्दीकरीता वापरता येईल, असेही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद असल्याचे मा. कामगार आयुक्त यांनी सांगितले.

वरील प्रपोजलप्रमाणे पुणे येथे सदरची योजना प्रायोगिक तत्वावर रु. १८ कोटींची अशासकीय संस्थेकडून राबविण्यात येत असल्याचे श्री. सतिश मगर, मालक प्रतिनिधी यांनी नमूद केले. त्यामध्ये क्रेडाई, बिल्डरर्स असोशिएशन ऑफ इंडिया, एल ॲन्ड टी, आयएलएफएस इ. चा समावेश असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**विषय क्र. ७) : बांधकाम कामगारांना व्यसनमुक्तीकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

अनेक बांधकाम कामगारांना दारुचे व्यसन असते व त्यामुळे कामगार मृत्यु पावतात. त्यामुळे बांधकाम कामगार कुठल्याही व्यसन मुक्ती केंद्रात उपचार घेत असेल तर सदर कामगाराचा तेथील खर्च मंडळामार्फत देण्यात यावा अशा प्रकारचा ठराव मागील बैठकीत सर्वानुमते घेण्यात आलेला आहे असे मा. अध्यक्ष यांनी सांगितले. त्यासाठी प्रती कामगार किती रक्कम द्यावी याबाबत सर्वानुमते ठराव होणे गरजेचे आहे असे मा. कामागर आयुक्त यांनी सांगितले. यावर चर्चा सखोल चर्चा होवून कोणताही बांधकाम कामगार व्यसनमुक्ती केंद्रात उपचार घेत असल्यास त्यास रक्कम प्रती कामगार रु. ६०००/- लाभ देण्यात यावा असा ठराव सर्वानुमते पारित झाला.

**विषय क्र. ८) : बांधकाम कामगारांचे आरोग्य विमाचे निविदा काढण्याबाबत.**

सदर योजनेंतर्गत बांधकाम कामगार व त्यांच्यावर अवलंबित पाच कुटुंबियांसाठी रु. २ लाख पर्यंतचा आरोग्य विमा न्यु इंडिया अशोरन्स प्रा.लि.. यांचेकडून शासन निर्णयानुसार मागील वर्षी काढण्यात आला होता. सदर योजनेचा कालावधी दिनांक २०.०८.२०१५ रोजी संपुष्टात आलेला असल्याची माहिती सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी दिली. यावर मा. अध्यक्षांनी मागील वर्षी मंडळामार्फत किती रक्कम कंपनीस प्रिमियम स्वरुपात भरण्यात आली व त्यापैकी किती रकमेचा कामगारांना लाभ मिळाला असे विचारले. यावर सहायक कामगार आयुक्त तथा सचिव रु. २० कोटींचे प्रिमियमची रक्कम भरण्यात आली आणि सुमारे रु. १४ कोटींचे पॉलिसी अंतर्गत कामगारांना फायदा झाला असल्याची माहिती दिली.

यावेळी कामगार आयुक्त यांनी योजनाबाबत माहिती देत सांगितले की, मेडिक्लेम योजनेअंतर्गत बांधकाम कामगार व त्याचे कुटुंबीय एम्पॅनल्ड हॉस्पिटलमध्ये कॅशलेस उपचार घेऊ शकतात. तसेच इतर हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यास त्यांनी केलेल्या खर्चाची इन्शॉरन्स कंपनीतर्फे प्रतीपूर्ती करण्यात येते. त्याचप्रमाणे कामगाराचा अपघाती मृत्यू झाल्यास अथवा त्यास अपंगत्व आल्यास देखील या योजनेअंतर्गत लाभ घेता येतो. त्यावर मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, आरोग्य विमा योजनेसाठी आपण तात्काळ ई-निविदा काढली पाहिजे.

यावर श्री. कोळसे, सह सचिव (कामगार) यांनी असे मत मांडले की, एवढया मोठया प्रमाणात इन्शोरन्स कंपनीला प्रिमियम रक्कम देण्यापेक्षा एखाद्या कामगाराला आजारी पडल्यानंतर जेवढे बिल येईल त्या बिलाप्रमाणे मंडळामार्फत पैसे अदा करण्यात यावे. यामुळे जास्तीत-जास्त कामगारांना फायदा होईल. कारण मेडिक्लेम पॉलिसी अंतर्गत बऱ्याच बिलांची रक्कम अदा करण्यात येत नाही किंवा त्यामध्ये काही काही औषधांची खर्च दिला जात नाही. त्यामुळे आरोग्य विमा योजनेसाठी ई-निविदा काढण्यास श्री. कोळसे, सह सचिव (कामगार) यांनी विरोध दर्शविला. तसेच श्रीमती मेघा आपटे यांनी केंद्र शासनाने बांधकाम कामगारांना कर्मचारी राज्य विमा योजनेअंतर्गत सामावून घेण्याचा निर्णय घेतला असल्याने बांधकाम कामगारांसाठी वेगळी आरोग्य विमा योजना बनविण्याची आवश्यकता नाही असे मत मांडले. त्याचप्रमाणे श्री. कुटासकर,

कामगार प्रतिनिधी यांनीही इन्श्युरन्स कंपन्यांकडून चांगल्या सेवा मिळत नसल्याने आरोग्य विमा योजना काढण्यात येवू नये असे मत मांडले. तसेच ईएसआयसी हॉस्पिटलमध्ये कामगारांचा उपचार करण्यात यावा व मंडळामार्फत त्यांच्या सर्व खर्चाची रक्कम अदा करण्यात यावी असेही ते म्हणाले.

यावर कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, आपल्याकडे ईएसआयसीचे हॉस्पिटल असतात त्यांचे कव्हरेज एरिया फार कमी आहेत आणि त्यामानाने सदरची हॉस्पिटल्स चांगली सेवा देत नाहीत. मा. अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, आपल्या मंडळाचे काम मोठ्या स्वरुपाचे असल्यामुळे तसेच सध्या फार कमी कर्मचारी वर्ग कार्यरत असल्याने विम्याचे काम आपल्या मंडळामार्फत करण्यात येवू नये. याकरीता ई-निविदा काढून पॉलिसी काढण्यात यावी. मा. अध्यक्षांनी पॉलिसीचा कालावधी दिनांक २०.०८.२०१५ रोजी संपुष्टात आल्याने यावर्षाकरीता तात्काळ ई-निविदा काढण्यात याव्यात व विमा कंपनीची नियुक्ती करण्यात यावी अशा सूचना सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांना दिल्या.

**विषय क्र. ९) : मंडळासाठी मान्य करण्यात आलेल्या ५६ पदांच्या भरतीबाबत.**

मा. अध्यक्षांनी सदरची ५६ पदे कशाप्रकारे भरण्यात येतील याबाबत कामगार आयुक्त यांना विचारणा केली.

यावेळी कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, मंडळासाठी मान्य करण्यात आलेल्या ५६ पदांपैकी वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून भरण्यात येतात. तर वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे जाहिरात देवून भरता येतील. परंतू वर्ग-३ ची पदे मुंबई येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडूनच भरण्यात येतात असेही त्यांनी नमूद केले. अधिनियमाच्या कलम २४(३) अन्वये प्रशासकीय खर्च हा त्या आर्थिक वर्षातील एकूण खर्चाच्या ५% इतकाच करु शकतो. परंतू वार्षिक ५% ही रक्कम फार कमी असते. त्यामुळे आपण ही पदे आतापर्यंत भरु शकलेलो नाही. परंतू आता आपल्याकडे निधी उपलब्ध असल्यामुळे काही प्रमाणात पदे भरु शकतो.

यावर मा. अध्यक्षांनी किती पद वर्ग-१ व वर्ग-२ चा आहेत व किती पद वर्ग-३ व वर्ग-४ चा आहेत अशी विचारणा केली. सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी सांगितले की, वर्ग-१ व वर्ग-२ ची अंदाजीत २० पदे असून उर्वरित वर्ग-३ व वर्ग-४ ची अंदाजीत ३६ पदे आहेत.

मा. अध्यक्षांनी येणाऱ्या बैठकीमध्ये पद भरतीसंदर्भातील सर्व शासन निर्णय मंडळासमोर सादर करण्यात यावा, असे सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांना सांगितले.

**विषय क्र. १०) : मंडळासाठी स्वतंत्र लेखापाल नियुक्त करणेबाबत.**

कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर मंडळासाठी स्वतंत्र लेखापाल नियुक्तीबाबत शासनास वेळोवेळी पत्र दिले आहे. तसेच लेखा व कोषागरे विभागास देखील पत्र देण्यात आलेले आहे. यावर श्री नकवी, शासकीय प्रतिनिधी यांनी सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यचे नमूद करुन सध्या अधिका-यांच्या पदोन्तीचे काम सुरु असल्याने ते पूर्ण होताच मंडळासाठी लेखापाल प्रतिनियुक्तीवर देण्यात येईल असे स्पष्ट केले.

**विषय क्र. ११) : मंडळाच्या योजनांची विविध माध्यमातून जाहिराती करणेबाबत.**

मा. अध्यक्षांनी मागील वर्षी ज्या जाहिराती केल्या त्या कोणत्या प्रकारे केल्या होत्या व जाहिरातींमुळे मंडळास काही फायदा होतो काय, याबाबत विचारणा केली.

यावर सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी असे सांगितले की, मागील वर्षी जाहिरातींबाबत शासनाने शासन निर्णय निर्गमित केले होते. त्यामध्ये कोणत्या एजन्सीला किती रकमेची जाहिरात द्यावी हे नमूद होते. त्यानुसार मागील वर्षी जाहिराती करण्यात आलेल्या आहेत व त्यामुळे बांधकाम कामगारांच्या नोंदित संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. यावर कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, मंडळामार्फत करण्यात आलेल्या जाहिरातींवर मोठया प्रमाणात खर्च झालेला आहे. त्यामुळे सदर प्रकरणी शासनाच्या अनेक विभागांच्या विरुध्द मा. उच्च न्यायालयात PIL दाखल करण्यात आले आहे. श्री. कोळसे पाटील, सह सचिव (कामगार)

यांनी असे सांगितले की, जोपर्यंत मा. उच्च न्यायालयाचा PIL चा निर्णय होत नाही तोपर्यंत बोर्डाने जाहिराती करु नयेत.

श्री. कुटासकर, कामगार प्रतिनिधी यांनी रेडिओवर (FM) जाहिराती देण्यात याव्यात असे सुचविले.

कामगार आयुक्त यांनी रेडिओवर जाहिरात करण्याकरीता बराच खर्च येतो त्यामुळे रेडिओवर जाहिरात देणे शक्य नाही.

यावर मा. अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, जेवढा खर्च जाहिरातींवर आतापर्यंत केला आहे त्यापेक्षा १० टक्केच रक्कम आपण यापुढे जाहिरांतींवर खर्च करु. तथापि बांधकाम कामगारांमध्ये जनजागृती करण्यासाठी जाहिराती करणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

**विषय क्र. १२) : मंडळाच्या योजनांच्या माहिती पुस्तिका छापून घेण्याबाबत.**

सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी मागील वर्षी शासनाच्या राष्ट्रीय खादी ग्रामोद्योग संस्थेमार्फत मंडळांतर्गत १ लाख माहिती पुस्तिका छापून घेण्यात आल्या होत्या असे सांगितले.

यावर मा. अध्यक्षांनी यावर्षी देखील १ लाख माहिती पुस्तिका छापण्यात याव्यात. त्यामध्ये मंडळाच्य विविध कल्यणकारी योजना नोंदणी प्रक्रिया  सर्व प्रकारचे अर्ज इ. चा समावेश असावा, असे सांगितले.

**विषय क्र. १३) : मंडळाच्या अध्यक्षांच्या मानधनाबाबत.**

कामगार आयुक्त यांनी मा. अध्यक्षांना आपले मानधन किती असावे अशी विचारणा केली असता, मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, मानधन हे सर्वानुमते ठरविण्यात यावे.

यावर श्री. कोळसे-पाटील, सह सचिव (कामगार) यांनी सांगितले की, इतर राज्यांतील मंडळाच्या अध्यक्षांना किती मानधन देण्यात येते हे तपासून त्याप्रमाणे मा. अध्यक्षांचे मानधन ठरविण्यात यावे असे सुचविले.

यावर कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की. इतर राज्यांतील मंडळाच्या अध्यक्षांचे मानधन त्याचप्रमाणे आपल्या शासनाच्या इतर मंडळातील अध्यक्षांचे मानधन पाहून या मंडळातील अध्यक्षांचे मानधन सर्वानुमते ठरवावे.

**विषय क्र. १४) : मंडळाच्या प्रशासकीय खर्चासाठी शासनाची मान्यता न घेणेबाबत.**

मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, एकूण वार्षिक खर्चाच्या पाच टक्के खर्च आपण प्रशासकीय बाबींवर करु शकतो असे अधिनियमातच नमूद असल्याने व मंडळासाठी कार्यालय घेणे हीदेखील प्रशासकीय बाब असल्याने इतर प्रशासकीय बाबींप्रमाणेच मंडळासाठी कार्यालय घेण्याच्या बाबीवर शासनमान्यता घेण्यात येवू नये. कामगार आयुक्त यांनी सांगितले की, बैठक भत्ता, प्रवास भत्ता, इ. अशा दैनंदिन खर्चासाठी शासनाकडे मान्यता घ्यावी लागत नाही. कारण ते किरकोळ खर्च असतात. परंतू मंडळास भाड्याने जागा घेणे मोठी बाब असल्याने यासाठी आपणास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि इतर दैनंदिन किरकोळ बाबींसाठी शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

**<u>मा. अध्यक्षांनी आयत्यावेळेस मांडलेले विषय</u> -**

१. बांधकाम कामगारांना रु. ३०००/- अर्थ सहाय्य योजनेंतर्गत लाभ दिला जातो तो DBT योजनेंतर्गत देण्यात येतो त्याची मुदत वाढ करण्याबाबत.

यावर सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी असे सांगितले की, सदर योजनेचा लाभ केवळ 31 ऑगस्ट २०१४ रोजी नोंदणी जिवित असलेल्या बांधकाम कामगारांसाठीच दयावयाचा असल्याने सदर योजनेत मुदतवाढ करता येणे शक्य नाही. यावर मा. अध्यक्ष यांनी असे सांगितले की, सदर योजनेचा कालावधी वाढविता येईल का ते बघावे. यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, एकाच प्रकारची योजना वारंवार राबविण्यापेक्षा आपण नवीन योजनेचा विचार करु. यामध्ये मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना बांधकामाशी संबंधित हत्यारे खरेदी करण्यासाठी रक्कम वाटप या योजनेचा विचार व्हावा.

त्याचप्रमाणे सदर मुद्दा पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असेही त्यांनी सांगितले. हा विषय येणा-'या बैठकीत (सभेत) घेण्यात यावे.

२. मंडळासाठी पूर्णवेळ सचिव नियुक्त करण्याबाबत.

याबाबत पूर्णवेळ सचिव नियुक्त करण्याकरीता शासनाकडे मान्यता मागविली आहे, असे मा. कामगार आयुक्त यांनी सांगितले. यावर मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, शासनाकडे जो प्रस्ताव दिलेला आहे तो कामगार विभागातील अधिका-यासाठी नाही. मंडळाकरिता कामगार विभागातीलच सचिव नियुक्त करणे योग्य राहील. त्यास श्री. नकवे, शासकीय प्रतिनिधी, श्री. कुटासकर, कामगार प्रतिनिधी व श्री मगर , मालक प्रतिनिधी यांनी सहमती दर्शविली. यावर कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, मी स्वत: सर्व कामगार उप आयुक्त तसेच अपर कामगार आयुक्त यांना याबाबत विचारले आहे. तथापि, कामगार आयुक्त कार्यालयातील कोणीही कामगार उप आयुक्त आणि अपर कामगार आयुक्त अधिकारी मंडळावर सचिव म्हणून येण्यास तयार नाही कारण सर्व अधिका-यांकडे त्यांचे मूळ काम तसेच अतिरिक्त कार्यभार आहेत. त्यामुळे सध्या श्रीमती भोसले यांना हा अतिरिक्त कार्यभार जबरदस्तीने देण्यात आलेला आहे. मंडळावर सचिव पदी एका अनुभवी अधिका-याची आवश्यकता आहे.

यावर मा. अध्यक्ष यांनी असे सांगितले की, सध्या जे सहायक कामगार आयुक्त सचिव पदाचा कार्यभार सांभाळत आहेत त्यांनाच या मंडळावर पुर्णवेळ सचिव म्हणून नियुक्त करण्यात यावे. त्यास श्रीमती भोसले, सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी नकार दर्शविला. यावर मा. अध्यक्ष यांनी कामगार विभागातील अधिका-यांना सचिव पदासाठी इच्छुक आहे किंवा नाही असे पत्राद्वारे पुन्हा विचारण्यात यावे, असे मा. कामगार आयुक्त यांना सांगितले. यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, कामगार विभागातील अधिकारी जर मंडळावर सचिव म्हणून नियुक्त होण्यास तयार असतील तर त्या अधिका-याची तात्काळ नियुक्ती करण्यात येईल.

३. अध्यक्षांचे अधिकारांबाबत

याबाबत सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी असे सांगितले की, मागील बैठकीत मा अध्यक्षांनी त्यांच्या अधिकारांबाबत दिलेले पत्र शासनास पाठविण्यात आले आहे. याबाबत शासनाचे उत्तर आल्यास तसे मा. अध्यक्षांना कळविण्यात येईल. हा विषय येणाऱ्या सभेत घेण्यात यावे.

४. सोयीसुविधा केंद्र (Facilitation Centres) उभारण्याबाबत

मा. अध्यक्ष यांनी असे सांगितले की, बांधकाम कामगारांकरीता प्रत्येक जिल्हात Facilitation Centre असावे त्यामध्ये बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे काम तसेच विविध योजनांचे फायदे त्यांना कळण्यासाठी बांधकाम कामगार त्यांना जमेल त्यावेळी अशा Facilitation Centres मध्ये येऊन नोंदणी करुन घेऊ शकतील. तसेच मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या लाभांची माहिती त्यांना Facilitation Centres मध्ये मिळू शकेल. असे Facilitation Centres प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी, महानगरपालिकेच्या प्रत्येक झोनमध्ये व सर्व नगरपालिका क्षेत्रात उभारण्यात यावे. याबाबत केंद्रशासनास Facilitation Centres उभारण्याबाबतचा प्रस्ताव पाठवावा व त्यात अधिनियमच्या कलम २४ (३) मध्ये नमूद असलेली ५ टक्के प्रशासकीय खर्चाची अट शिथिल करण्याचे नमूद करावे असे सर्वानुमते ठरले.

तसेच मंडळाच्या मोबाईल व्हॅन्स असाव्यात ज्यामधून मंडळाच्या योजनांची ठिकठिकाणी जाहिरात करता येईल. याबाबतचे काम लवकरात लवकर करण्यात यावे अशा सूचना मा. अध्यक्ष यांनी सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांना दिल्या.

मा. कामगार आयुक्त यांनी सर्व उपस्थितांना सांगितले की, दि.१३.०९.२०१५ रोजी मा. पंतप्रधान यांचा कार्यक्रम नियोजित आहे. सदर कार्यक्रमामध्ये असंघटित कामगारांना UWIN कार्डसचा सर्व खर्च महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम मंडळाकडे जमा असलेल्या उपकराच्या निधीतून करण्यात यावा अशा सूचना शासन स्तरावरून देण्यात आल्याचेही मा.

कामगार आयुक्तांनी सर्व उपस्थितींच्या निदर्शनास आणून दिले. त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

५. मा. अध्यक्षांनी कामगार आयुक्त कार्यालयाच्या जिल्हा कार्यालयांना भेट दिल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा कार्यालयांच्या बाहेर इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कार्यालयाचे बोर्ड कुठेही लागलेले नाहीत याबद्दल खेद व्यक्त केला.

६. मा. अध्यक्षांनी उस्मानाबाद येथील जिल्हा कार्यालयास भेट दिल्याचे व तेथील सरकारी कामगार अधिकारी श्री. पांडे यांच्याविरुध्द खूप तक्रारी आहेत, असे सांगितले. श्री पांडे यांनी अपघाती निधन झालेल्या बांधकाम कामगारांना लाभ दिलेला नाही अशी तक्रार त्यांचेविरुध्द आल्याचेही सांगितले. याबाबत मा. कामगार आयुक्त यांनी औरंगाबाद विभागाचे विभाग प्रमुख यांचा अहवाल मागविण्यात येईल असे सांगितले.

७. मा अध्यक्षंनी नागपूर येथे १५ कामगारांनी नुतनीकरण करण्याकरीता अर्ज करुन त्यांचे पैसे भरलेअसूनही त्यांचे नुतनीकरण करुन मिळालेले नाही. याबाबत चौकशी अहवाल मागवावा, असे सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांना सांगितले.

८. मा. अध्यक्ष यांनी असे सांगितले की, मंडळाची बैठक वारंवार ठरते व रद्द होते. दिनांक १४.०८.२०१५ रोजी देखील बैठक ठेवण्यात आली व नंतर ती रद्द करण्यात आली. परंतू काही सदस्य कामगार आयुक्त कार्यालयात बैठकीकरीता हजर झाल्यानंतर त्यांना ही गोष्ट कळली. यासाठी मंडळ बैठक वेळेवर रद्द झाली किंवा बैठक रद्द होण्याची पूवर्सूचना देणे शक्य झाले नाही तर सदस्यांना त्यांचा प्रवास खर्च व बैठक भत्ता देण्यात यावा असे सुचविले. त्यास सर्व उपस्थित सदस्यांनी सहमती दर्शविली. मंडळ बैठक वेळेवर रद्द झाली किंवा बैठक रद्द होण्याची पूवर्सूचना देणे शक्य झाले नाही तर सदस्यांना त्यांचा प्रवास खर्च व बैठक भत्ता देण्यात यावा असा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपली असे जाहीर केले.

**********

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई-४०० ०५१.**